# जिल्हास्तरीय कामवाटप समिती तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे कडुन सभे बाबत निवेदन



सदस्य सचिव जिल्हा स्तरीय कामवाटप समिती, तथा कार्यकारी (बांधकाम) अभियंता, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांजकडून निवेदन.

रायगड जिल्हा परिषदेकडील जिल्हास्तरीय कामवाटपाच्या यापुढील होणाऱ्या सर्व सभा दर महिन्याच्या ६ तारखेला ३.०० वाजता सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप करावयाच्या कामांबाबत व सायंकाळी ४.०० वाजता मजुर सहकारी संस्थांना वाटप करावयाच्या कामांबाबत जिल्हा परिषदेच्या तु.ह.वाजेकर सभागृहात घेण्यात येतील याची जिल्हा परिषदेकडे नोंदणी झालेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांचे चेअरमन यांनी नोंद घ्यावी व सदर सभांना आपण स्वत: हजर रहावे, व्यक्तीश: हजर न राहिल्यास काम वाटप केले जाणार नाही याची नोंद घ्यावी. दिनांक ३ तारखेस वाटप करावयाच्या कामाची यादी या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल, त्यानुसार ४ तारखेपर्यंत कामाचे मागणीपत्र या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी आल्यास दुसऱ्या दिवशी त्याच वेळेत सभा घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदस्य सचिव
जिल्हा स्तरीय काम वाटप समिती
रायगड जिल्हा परिषद तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग